दर्शन टुरिझम

५८५ – पुणे ३.शॉप नं ,श्रीनिवास अपार्टमेंट ,नारायण पेठ ,४११०३०

# श्री केदारनाथ – बद्रीनाथ  दोन धाम सहल (०८ दिवस)

## सहलीचा दिनवार कार्यक्रम

| दिनांक | दिवस | कार्यक्रम |
|---|---|---|
| | पहिला | डेहराडून आगमन व लगेचच हरिद्वारकरिता प्रयाण. हरिद्वार आगमन व मुक्काम. (सायंकाळी गंगा आरती ऐच्छिक ) (रात्रीचे जेवण) |
| | दुसरा | सकाळी लवकर हरिद्वार सोडणे रामपूर फाटा जाणे व मुक्काम. (चहा, नाष्टा व रात्रीचे जेवण) |
| | तिसरा | केदारनाथ दर्शनसाठी राखीव दिवस. (चहा, नाष्टा व रात्रीचे जेवण) |
| | चौथा | केदारनाथ दर्शनोत्तर रामपूर फाटा येणे व मुक्काम.  (चहा, नाष्टा व रात्रीचे जेवण) |
| | पाचवा | रामपूर फाटा सोडणे बद्रीनाथ करिता, बद्रीनाथ आगमन व मुक्काम. (चहा, नाष्टा व रात्रीचे जेवण) |
| | सहावा | सकाळी नाष्ट्यानंतर , बद्रीनाथ दर्शन, पूजा, अभिषेक नंतर माना बॉर्डर करून जोशी मठ / रुद्रप्रयाग जाणे व मुक्काम. (चहा, नाष्टा व रात्रीचे जेवण) |
| | सातवा | रुद्रप्रयाग / जोशी मठ सोडणे ऋषिकेश दर्शनोत्तर  ऋषिकेश / हरिद्वार जाणे व मुक्काम.  (चहा, नाष्टा व रात्रीचे जेवण) |
| | आठवा | सकाळी नाष्ट्यानंतर, हरिद्वार / ऋषिकेश सोडणे डेहराडून करिता, व डेहराडून सोडणे विमानाने पुणे करिता, पुणे आगमन व सहल समाप्त. (चहा, नाष्टा) |

**सहलीतील व्यवस्था :**

**१. विमान प्रवास** – पुणे – डेहराडून – पुणे (अतिरिक्त खर्च)

**२. बस प्रवास** – डेहराडून पासून सहल पूर्ण होऊन परत डेहराडून पर्यंत 2X2 मिनी कोच ने स्थानिक स्थलदर्शन होईल.

**३. मुक्काम व्यवस्था** – सर्व ठिकाणी डीलक्स दर्जाचे हॉटेल्समध्ये मुक्काम व्यवस्था केली जाईल.

**४. भोजन व्यवस्था** – – विमान प्रवास वगळता सर्व ठिकाणी आमच्या आचाऱ्यांनी तयार केलेले शुद्ध शाकाहारी मिष्टांन भोजन दोन वेळा, चहा अथवा कॉफी ३ वेळा व नाष्टा १ वेळा.

**सहल खर्चात समाविष्ट नसलेल्या बाबी:**

- पुणे – डेहराडून – पुणे हा विमान प्रवास खर्च हा सहल खर्चामध्ये समाविष्ट नाही.
- दुपारचे जेवण सहल खर्चामध्ये समाविष्ट नसेल याची नोंद घ्यावी.
- विमान प्रवासातील जेवण, चहा – नाष्टा ई. खर्च सहल खर्चामध्ये समाविष्ट नाही याची नोंद घ्यावी.
- केदारनाथ येथील डोली / घोडा अथवा हेलिकॉप्टर चा खर्च सहल खर्चामध्ये समाविष्ट नाही.

## महत्वाची सूचना

बद्रीनाथ , केदारनाथ दोन धाम ही सहल उत्तरांचल राज्यातील अती दुर्गम भागातील असून साधारणत: अक्षय तृतीया ते दिवाळीतील पाडवा याच दरम्यान आपण तेथे दर्शनासाठी जाऊ शकतो. बाकी कालावधी मध्ये ही मंदिरे पूर्णपणे बंद असतात. दर्शन कालावधी मधील ६ महिन्यातही जवळ जवळ ३ महीने मुसळधार पाऊस या भांगांमध्ये पडतो. या सर्व कारणांचा तेथील व्यवस्थेवर परिणाम होत असून साधारण स्वरूपाचे हॉटेलही खूप महाग असतात. तरी आम्ही सहलीचा खर्च हा मध्यम स्वरूपाचे हॉटेल चा दर्जा असा गृहीत धरून काढला आहे. तरी कृपया कोणीही हॉटेल्स बूकिंग बद्दल तक्रार करू नये ही विनंती.

## कॅन्सलेशनविषयी थोडे

१. सहलीमध्ये एकदा ॲडव्हान्स रक्कम भरून बूकिंग केल्यानंतर येणाऱ्या कुठल्याही नैसर्गिक अडचणी (कोव्हिड चे नवीन प्रकार / पाऊस / वादळ / दंगल / निवडणूका / वैयक्तिक आजारपण / घरातील व्यक्ती निर्वतणे / अन्य कोणतीही ) आल्यास व त्यामुळे आपण आपले बूकिंग रद्द (कॅन्सल) केल्यास, आपणास कुठल्याही परिस्थितीमध्ये भरलेला ॲडव्हान्स रकमेचा रोख परतावा हा परत न मिळता सदरची रक्कम कॅन्सलेशन पोटी जमा केली जाईल.

२. सहलीची मिटींग झाल्यानंतर आणि सहलीची पूर्ण रक्कम भरून झाल्यानंतर वर क्र. १ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही कारणास्तव आपण आपली सहल जर ३० दिवस आधी रद्द केली तर ५०% रक्कम कॅन्सलेशनपोटी, आपण आपली सहल जर १५ दिवस आधी रद्द केली तर ७५% रक्कम कॅन्सलेशनपोटी आणि आपण आपली सहल जर ८ दिवस आधी रद्द केली तर १००% रक्कम कॅन्सलेशनपोटी कापून घेण्यात येईल. तसेच वरीलप्रमाणे कॅन्सलेशनपोटी कापून राहिलेल्या रकमेचा रोख परतावा कोणत्याही परिस्थितीत आपणास देण्यात येणार नाही. सदर कॅन्सलेशनपोटी कापून शिल्लक राहिलेली रक्कम पुढील ३६५ दिवसांत कुठल्याही सहलीमध्ये आपण सहभागी झालात तर ती ॲडजेस्ट केली जाईल.

३. सदरील सहलीमध्ये विमानाचे तिकीट हे नॉन-रिफंडेबल ( Non-Refundable) असेल याची प्रामुख्याने नोंद घ्यावी.

| Cancellation Policy (as per Indian Government) | |
|---|---|
| Condition | Cancellation Charges |
| 21 Days prior (Excluding departure date) | 30% of the package cost |
| 21 – 15 Days (Excluding departure date) | 55% of the package cost |
| 14 – 08 Days (Excluding departure date) | 80% of the package cost |
| 07 – 0 Days / No Show | 100% of the package cost |

**स्थल दर्शनाचा तपशील :**

**हरिद्वार** – बळी राक्षसाला प्रसन्न होऊन तीन पावलांत संपूर्ण संसार व्यापताना भगवान विष्णुंनी आपले तिसरे पाऊल या ठिकाणी ठेवले अशी पौराणिक कथा प्रसिद्ध आहे. भगवान विष्णुंनी पाऊल जेथे ठेवले अशी हरी की पायरी, गंगा आरती (ऐच्छिक)

**ऋषिकेश** – गंगा नदीच्या किनारी असलेले ऋषिस्थान म्हणून प्रसिद्ध, लक्ष्मण झुला, कैलास आश्रम, गीता मंदिर व परमार्थ निकेतन ई.

**देवप्रयाग** – भागीरथी व अलकनंदा या दोन नद्यांचे संगमाचे स्थान.

**गौरीकुंड** – माता पार्वतीने येथील गरम पाण्याचे कुंडीमध्ये स्नान केले होते.

**श्री केदारनाथ** – बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले भगवान शंकराचे स्थान. अत्यंत प्राचीन केदारनाथ मंदिर तसेच मंदाकिनी नदीचे उगमस्थान व आद्य शंकराचार्यांचे समाधीस्थान.

**सोनप्रयाग** – सोनगंगा व मंदाकिनी या दोन नद्यांचे संगमाचे स्थान.

**कर्णप्रयाग** – सूर्याने कर्णाला कवचकुंडले या ठिकाणी प्रदान केली होती असे वर्णन पुराणात आहे. अलकनंदा व कर्णावती या दोन नद्यांचे संगमाचे स्थान.

**श्री बद्रीनारायण** – भरतातील चारही दिशांचे जे चार धाम आहेत त्यापैकी एक. भगवान विष्णू मंदिर दर्शन तसेच गरम पाण्याचे कुंड.

**माना** – भारतातील उत्तरेकडील शेवटचे टोक व सरस्वती नदीचे उगमस्थान.